आजचा दिनविशेष

२००९ : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (खडठज) चांद्रयान-ख, औपचारिक समाप्ती.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | शनिवार ३० ऑगस्ट २०२५ | अंक २५० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# आता फुल ऑन फाईट होणार, तुमचे नेते काय करणार? मनोज जरांगें पाटलांचा चा सरकारला सवाल

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदानावर पुन्हा एकदा आमरण उपोषण चालू केले आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातील मराठा समाज मुंबईत पोहोचला आहे. मुंबईत पाऊस चालू असूनदेखील आझाद मैदान मराठा आंदोलकांनी भरून गेले आहे. जरांगे यांच्या आंदोलनाला सरकारने अगोदर एकाच दिवसाची परवानगी दिली होती. आता ही परवानगी आणखी एका दिवसाने वाढवण्यात आली आहे. असे असतानाच आता मराठा आरक्षणाचा कायदेशीर लढा लढणारे विनोद पाटील यांनी मराठा आरक्षण देण्यासाठी महत्त्वाचा पर्याय समोर आणला आहे. तसेच त्यांनी मराठा आरक्षण कसे मिळू शकते याबाबतही सविस्तर सांगितलं आहे.



## मराठ्यांनी कंटाळून मुंबई सोडून जावे असा यामागे डाव

मराठा समाजाच्या मुलांना लघवी करण्याचीही सोय नाही. वडापाव किंवा इतर खाद्यपदार्थांची दुकाने बंद करण्यात आली आहेत. पाणी प्यायचीही सोय नाही. मराठ्यांनी कंटाळून मुंबई सोडून जावे असा यामागे डाव आहे, असा आरोपही मनोज जरांगे यांनी केला

## आरक्षण दिल्यास मराठे तुम्हाला विसरणार नाहीत

आंदोलकांना त्रास दिला जात आहे, सरकारने भंगार खेळ खेळणे बंद करावं. तुम्ही आम्हाला इथे त्रास दिला तर तुम्ही आमच्याकडे आलात तर आम्हीही त्रास देऊ. मुंबईत गेल्यावर आमचे हाल केले हे आमच्या लक्षात असेल. हे असले भंगार खेळ खेळण्यापेक्षा सरकारने मराठ्यांना आरक्षण देऊन टाकावे, सरकारला ही संधी आहे, आरक्षण दिल्यास मराठे तुम्हाला विसरणार नाहीत, असेही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले.

## देवेंद्र फडणवीस यांचं नेमकं कर्तृत्व काय

नेते का उत्तर देत नाहीत हे आम्हालाही माहिती नाही. पण आम्हीही खंबीर आहोत. आम्ही नेत्यावर जगतच नाही. आम्ही आमच्या म्हणण्यांनुसार चालतो. कोणी मंत्री, कोणी खासदार, कोणी आमदार भेटायला आला तर आमचं काम त्यांचा सन्मान करणं. आम्ही मागे हटत नाही हा आमच्या समाजाचा प्लस पाईंट आहे. देवेंद्र फडणवीस यांचं नेमकं काय कर्तृत्व आहे, हे जरा तुम्ही सांगा, असा सवाल मनोज जरांगेंनी विचारला.

# श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम.

केज प्रतिनिधी केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त व दहिहंडी उत्सवा निमित्त मुलांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील ग्रामीण भागात अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या व इंग्रजी माध्यमाचे उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण देणाऱ्या श्री संस्कार एज्युकेशन ग्रुपच्या श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये मागे होवुन गेलेल्या स्वातंत्र्य दिनानिमित्त व दहिहंडी उत्सवा निमित्त मुलांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज,



स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले, विद्या देवता माता सरस्वती चे पुजन व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर मा. रमेश भिसे साहेब, सचिव जनविकास सेवा भावी संस्था केज, संजीवनी राऊत, काकासाहेब कोल्हे सर यांनी श्री संस्कार एज्युकेशन ग्रुप च्या पुढील वाटचालीसाठी गौरवोद्गार काढून शुभेच्छा दिल्या. त्यानंतर श्री संस्कार इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त भाषणे व श्री कृष्ण चरित्र गीते, गवळणी व देश भक्ती पर गीतांवर बहारदार नृत्य सादर केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. रमेश भिसे साहेब सचिव जनविकास सेवा भावी संस्था केज हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच सौ. रोहिणीताई सुनील देशमुख, कैलास पाटील सरपंच साळेगांव, रब्बानी सर, अध्यक्ष जिनीयस इंग्लिश स्कूल, ह.भ.प. आबा महाराज मेहरकर, काकासाहेब कोल्हे सर, संजीवनी राऊत, सुनील बापू देशमुख, ग्रामपंचायत सदस्य बालाजी राऊत, रामभाऊ गलांडे, शहाजी अप्पा गलांडे, रजनी देशमुख मॅडम, बापुराव तोंडे, ज्ञानेश्वर भांगे, पत्रकार ज्योतीराम सावंत, रामदास सपाटे, अमोल कापरे, अतुल देशमुख, श्री संस्कार इंग्लिश स्कूल चे अध्यक्ष अनिल गलांडे हे होते. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रिन्सीपल सीमा काळे, व त्यांच्या शिक्षक टिमने परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष अनिल गलांडे यांनी केले तर सूत्रसंचालन आरती आचार्य मॅडम व सीमा काळे मॅडम यांनी केले.

# ' जिकडे तिकडे चोहीकडे , शहरात रोडवर पाणी सगळीकडे :- शेख युनूस

बीड (प्रतिनिधी ) मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब,बीड शहरात प्रत्येक रोडवर गटारी भरून वरून पाणी जात आहे. कारण कचरामुळे नाल्या भरलेल्या आहेत.याला जिम्मेदार फक्त नगरपरिषद आहे. ' जिकडे तिकडे चोहीकडे 'शहरात रोडवर पाणी सगळीकडे, असंच म्हणावं लागेल. कारण शहरात अशी एक पण गल्ली किंवा रोड नाही जिथे गटारीतून घाण बाहेर येत नाही व काही ठिकाणी तळ्याचे स्वरूप आलेत ते दिसून येत आहे. प्रत्येक रोडवर पाणीच पाणी झालेले आहे.साहेब आपण रेनकोट घालून पावसात टू व्हीलर वर शहरांत फिरा मग आपल्याला कळेल शहराची अवस्था. सध्या सणासुदीचे दिवस आहेत आणि त्यात पावसाळा असल्यामुळे प्रत्येक गल्ली, बोळात , तसेच मेन रोडवर देखिल नाल्या तुंबलेल्या असल्यामुळे रोड वरून पाणी जात आहे. दोन दिवसाच्या पावसात नगरपालिका ची अब्रू बाहेर आली असंच म्हणावं लागेल. वेळोवेळी गटारी साफसफाई होत नसल्यामुळे मच्छर प्रमाण वाढत असून त्यामुळे रोगराई पसरत आहे. त्याचबरोबर दूषित पाण्यातून जावे लागत असल्यामुळे नागरिकाच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे. नागरिकाची अपेक्षा आहे की स्वच्छ बीड सुंदर बीड कधी होणार.



# फातेमा नगर, प्रभाग क्र,2 मध्ये पिण्याच्या पाण्याची टाकीचे बंद काम वर बेशरम झाडे लावणार ,,AIMIM

चार वर्ष पासून टाकीचे उद्घाटन थाट माठात आमदार यांनी केले परंतु काम बंद करून गुत्तेदार फरार, , माजलगाव, प्रतिनिधी, जावेद कुरेशी,

माजलगाव शहरातील फातेमा नगर येथे माजलगाव नगरपरिषद कार्यालय कडून १५ व्या वित्त योजना अंतर्गत १८ ला लाख लीटर टाकी फातेमा नगर मध्ये पिण्याच्या पाण्याची टाकी निर्माण करण्यात येत होती परंतु उद्घाटन दि,०१/११/२०२१ रोजी करण्यात आले परंतु संबंधित बांधकाम करताना बंद करण्यात आले त्या अर्धा वाट काम तात्काळ चालू करण्यात यावे.

फातेमा नगर येथे पिण्याच्या पाण्याची टाकीचे काम तात्काळ चालू करण्यात यावे तसेच काम बंद करणाऱ्या संबंधित अधिकारी व गुत्तेदार यांची तात्काळ चौकशी समिती गठीत करावी नसता लोकशाही मार्गाने त्याठिकाणी बंद पाण्याच्या बांधकाम वर बेशरम झाडे लावा आंदोलन दि,०९/०९/२०२५. रोजी ठिक ११:३० वाजता ढोल वाजत गजत त्याठिकाणी निषेध म्हणून करण्यात येईल याची नोंद घ्यावी अशी मागणी AIMIM वतीने करण्यात आली आहे

# पूरसंकटावर मात करण्यासाठी प्रशासन सज्ज – नागरिकांनी घ्यावी काळजी , सावधगिरी बाळगणे गरजेचे : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

. गुरुवारी ( 28 ऑगस्ट ) संपूर्ण बीड जिल्हाभर पावसाची रिपरिप सुरु होती . बीडसह महाराष्ट्रातील पावसाळ्यात पूरस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाचा आपत्ती व्यवस्थापन , मदत व पुनर्वसन विभाग तसेच बीड जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे . भारतीय हवामान विभागाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या इशाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना सतर्कतेचे निर्देश देण्यात आले आहेत . “ पूरप्रवण भागातील नागरिकांनी प्रशासनाशी पूर्ण सहकार्य करावे . नदी, नाले, धरण, तलाव या ठिकाणी जाणे टाळावे . सुरक्षित स्थळी हलण्यास प्रशासनाने सांगितल्यास त्वरित पाऊल उचला, ” असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आवाहन केले आहे .

अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नागरिकांना सूचना देताना “ अधिकृत सूचनांचे पालन करा, अफवांवर विश्वास ठेवू नका . महत्त्वाची कागदपत्रे, औषधे, अन्नसाठा आणि पिण्याचे पाणी सुरक्षित ठेवा , ” असे सांगितले . तर अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे-सोनवणे यांनी “ पूराच्या पाण्यातून पायी किंवा वाहनाने जाणे जीवघेणे ठरू शकते . मोबाईल चार्ज ठेवावा, सुरक्षित पाणीच वापरावे, ” असा इशारा दिला .

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशांत वाघमारे यांनी नागरिकांना दिलासा देताना “ पूरस्थिती किंवा आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांनी घाबरून न जाता तातडीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा . प्रशासन पूर्णपणे सज्ज असून त्वरित मदत पुरवली जाईल, ” असे सांगितले . त्यांचा संपर्क क्रमांक 9561499449 असून, याशिवाय आपत्कालीन क्रमांक 1077 / 1000 / 992 हे नेहमी खुले असतील . अधिकृत माहिती एस डी एम ए ऍट महाराष्ट्र या वेबसाईटच्या माध्यमातून मिळेल .

पूर ओसरल्यानंतर घरात परतताना स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण आवश्यक आहे . दूषित पाणी व सडलेले अन्न टाळा, असे उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी कटाक्षाने नमूद केले .

जिल्ह्यात मागील 24 तासांत सरासरी 25 मिमी पावसाची नोंद झाली असून आतापर्यंत 421.7 मिमी पाऊस झाला आहे . हा वार्षिक सरासरीच्या तुलनेत 75 टक्के इतका आहे . बीड जिल्ह्यातील माजलगाव , माजलगाव तलाव, सिंदफणा नदी परिसर , तसेच पाटोदा , आष्टी या भागांना पावसामुळे विशेष दक्षतेचे निर्देश दिले आहेत .

# बीडच्या वादकांचा नाद आता उत्तरप्रदेश मध्ये घुमणार.

बीड (प्रतिनिधी) - संपुर्ण महाराष्ट्रात पारंपारिक ढोल ताशा पथकांची क्रेझ सुरू असताना बीड जिल्हाही यात आता मागे राहिलेला नाही, बीड जिल्ह्यात विविध असे 8- 10 पथक तयार झाले असून याची सुरुवात 2016 साली स्थापन झालेल्या धर्म योद्धा ढोल ताशा व ध्वज पथक यांनी केली. बीड शहरात ढोलाचा निनाद म्हटलं की धर्म योध्दा ढोल ताशा व ध्वज पथक हे सर्वत्र परिचित आहे; पंढरपूरकडे मुक्ताई मातेची पालखी निघते अगदी त्याच दिवशी या ढोल पथकाने आपला निनाद बीड शहरात घुमवला. हा निनाद आता बीड जिल्ह्यापुरताच मर्यादित न राहता वाराणसी, लखनऊ तसेच उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी बाबांच्या गावापर्यंत, त्यांच्या मठापर्यंत जाऊन धडकला आहे. योगी आदित्यनाथ यांचा मनकामनेश्वर मठ, लखनऊ येथील श्री महंत गोमती माता यांनी सालाबादप्रमाणे याहीवर्षी गणेश उत्सवानिमित्त धर्मयोध्दा ढोल ताशा व ध्वज पथकाला बोलवणे धाडले असून यासाठी बीड जिल्ह्यातील 50 युवक व महिला ढोल वादक हे आज 29 ऑगस्ट रोजी रवाना झालेले आहे.

# बीड शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या उत्कृष्ट देखाव्याला मिळणार लाखांचे बक्षीस

## देखावा साकारणाऱ्या गणेश मंडळांनी नाव नोंदणी करावी-डॉ.योगेश, डॉ.सारिका क्षीरसागर



बीड (प्रतिनिधी) दि.२९ : बीडमध्ये सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या 'कल्पतरू प्रतिष्ठान'च्या पुढाकारातून उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, 'कल्पतरू'च्या सचिव डॉ.सारिका क्षीरसागर यांनी केले आहे. गणेश चतुर्थीनिमित्त सार्वजनिक गणेश मंडळ लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी उत्सुक होते. यंदा गणरायाचे आगमन सर्वत्र अतिशय उत्साहात झाले आहे. यावर्षीही 'कल्पतरू'च्या पुढाकारातून आकर्षक देखावे साकारणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धेचे आयोजन केले आहे. देखाव्यांमध्ये सांस्कृतिक परंपरा, ऐतिहासिक, धार्मिक, आध्यात्मिक, शैक्षणिक, वैज्ञानिक आणि स्थानिक ग्रामीण व शहरी जीवनाशी संबंधित सामाजिक संदेश देणारे देखावे साकारणे अपेक्षित आहे. अशा देखाव्यांपैकी उत्कृष्ट मंडळास सन्मानित करण्यात येईल.

- - - - - - - - - - - - -

### अशी असतील बक्षिसे; उत्तेजनार्थ मंडळांनाही रोख बक्षिस दिले जाणार

पहिल्या क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळास १ लाख, द्वितीय क्रमांकास ७५ हजार, तृतीय क्रमांकास ५१ हजार व सन्मानचिन्ह, तसेच उत्तेजनार्थ मंडळांनाही रोख रक्कम बक्षिस स्वरूपात दिली जाणार आहे. दरम्यान, हा बक्षीस वितरण सोहळा गणेशोत्सव कालावधीत आयोजित केला जाईल, अशी माहिती संयोजकांनी दिली आहे.

### अशी आहे निवड समिती

उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळांच्या देखाव्यांची निवड करण्यासाठी निरीक्षण समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये प्रा.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, प्रा.संजय पाटील देवळाणकर, प्रा.सारंग वाघमारे, फामजी पारीख, विद्याभूषण बेदरकर यांचा समावेश आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मंडळांनी नोंदणीसाठी श्रीमंत तोंडे ८३२९२५९२९५ व नागेश शेटे ७०५७०२६८७७ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ३० ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## जगातील सर्वात महागड्या परिसरात आहे बिल गेट्स यांचे निवासस्थान, काय आहेत सुविधा ?



जगातील सर्वाधिक श्रीमंत लोकांपैकी एक असलेले मायक्रोसॉफ्टचे संस्थापक बिल गेट्स हे लक्झरीयस लाईफ स्टाईलमुळेही चर्चेत असतात. त्यांचे निवासस्थान हे पश्चिम अमेरिकेतील सर्वात महागड्या परिसरात आहे. त्यांचे निवासस्थान एका महालासारखे आहे. त्यांच्या घराची नेमकी काय वैशिष्ट्ये आहेत हे आपण पाहूयात बिल गेट्स यांच्या निवासस्थानाचे नाव Xanadu 2.0 आहे. हे जगातील सर्वात हायटेक आणि आलिशान प्रॉपर्टी मानले जाते. हे घर ६६,००० चौरस फूटावर पसरलेले आहे. आणि याची किंमत सुमारे १२६ कोटी डॉलर ( सुमारे १०,००० कोटी रुपये ) म्हटली जाते. हा आकडा थोडा मागे पुढे असू शकतो. परंतू हे घर काही सामान्य घर नाही ते सुपर लक्झरी पॅलेस आहे. या महालात सात मोठे बेडरुम आणि २४ बाथरुम आहेत. या शानदार घरात जर तुम्ही गेलात तर आतील सुविधा हैराण करणाऱ्या आहेत. एका हाय टेक किचनमध्ये कोणतीही डीश तयार करण्याच्या एडव्हान्स मशीन्स लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे तुम्हाला काही खायचे आणि प्यायचे असेल तर जास्त विचार करायचा गरज नाही. या घरात एक लायब्ररी आहे.ज्यात हजारो पुस्तके आहेत. बिलगेट्स येथे आपला वेळ घालवतात. तसेच मोशन सेंसर आणि स्मार्ट टेक्नॉलॉजीने संपूर्ण घर नियंत्रित केले जाते. लाईट, एसी, गार्डन सर्वकाही एका क्लिकवर बंद होते आणि सुरु होते. म्हणजेच संपूर्ण घर हायटेक सुविधेने सुसज्ज आहे. स्पेशल फीचर्स हॉलीवूडसारखे थिएटर रुम येथे आरामात जीवनाचा आनंद कोणताही व्यक्ती घेऊ शकतो. इनडोर स्विमिंग पूल आणि आऊटडोर गार्डन या दोन्ही जागी आराम आणि एंटरटेन्मेंटसाठी आहेत. हेल्थ एण्ड फिटनेस झोन जिम, योगा स्टूडियो आणि स्पाची देखील सोय आहे. सस्टेनेबल टेक्नोलॉजी म्हणजे संपूर्ण घर सोलर पॉवर आणि एनर्जी-एफिशिएंट आहे. लाईफस्टाईलची झलक बिल गेट्सचे घर केवळ आलीशान नाही तर त्यांच्या लाईफस्टाईला देखील दर्शवते. या फॅमिली टाईम, हुमॅनिटेरियन मिटींग्स आणि रिसर्च प्रोजेक्टसाठी जागा आहे. बिल आणि मेलिंडा गेट्स फाऊंडेशनची मिटींग आणि रिसर्च प्रोजेक्टसाठी देखील जागा आहे. बिल आणि मेलिंडा गेट्स फाऊंडेशनच्या मिटींग या घरात नेहमीच होतात. घरात इतकी स्पेस आणि टेक्नॉलॉजी असूनही बिल गेट्स आणि त्यांचे कुटुंबांची लाईफ खाजगी आणि रिलॅक्स असते. त्याचे घर एक प्रकारे फ्युचरिस्टीक घर प्लस लक्झरी लाईफस्टाईल या दोन्हींचे मिश्रण आहे. जर तुम्ही विचार करत असाल की जगातील श्रीमंत लोक कसे रहात असतील तर Xanadu 2.0 हे त्याचे उदाहरण आहे.

# पिकांची व मालमत्तेची काळजी घ्या : प्रशासन सदैव तुमच्या पाठीशी आहे – तहसीलदार चंद्रकांत शेळके





बीड जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सतत कोसळणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. अंथरवन पिंपरी तांडा तसेच परिसरातील अनेक भागात शेतपिके पाण्याखाली गेली आहेत. या पार्श्वभूमीवर २९ ऑगस्ट रोजी तहसीलदार चंद्रकांत शेळके, गटविकास अधिकारी अशोक राठोड आणि तालुका कृषी अधिकारी अशोक साळी यांनी गावाला भेट देऊन शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. --- प्रशासनाची तत्परता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी नैसर्गिक आपत्तीबाबत संवेदनशीलता दाखवून प्रत्येक प्रकरणावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक व अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे – सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांत प्रशासन सतर्क आहे. पावसाने झालेल्या नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना पिके वाचवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचे मार्गदर्शन करण्यात आले. --- शेतकऱ्यांशी थेट संवाद तहसीलदार शेळके यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांनी दिलेल्या आश्वासनामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. गावकऱ्यांनी प्रशासनाच्या संवेदनशीलतेबद्दल समाधान व्यक्त केले. --- पिचलेला पण न डगमगणारा बळीराजा दरवर्षी दुष्काळ, अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे शेतकऱ्यांची स्वप्ने चुरगळली जातात. कर्जाचा बोजा आणि पिकांचा खर्च असूनही तो पुन्हा उभा राहतो आणि आशेची पालवी रुजवतो.

> “पाऊस कधी द्रोही तर कधी जीवनदाता, कधी आशा तर कधी निराशेचा झरा. तरीही बळीराजा लढतो अखंड — कारण मातीतूनच त्याला उगम मिळतो नवा.”

--- पावसाचा आढावा बीड जिल्ह्यात यंदा आतापर्यंत ४७० मि.मी. पाऊस झाला असून तो हंगामाच्या ८३ टक्के इतका आहे. मागील वर्षी याच काळात ५५१ मि.मी. पाऊस झाला होता. केवळ मागील २४ तासांत – शिरूर कासार : ८९ मि.मी. अंबाजोगाई : ६५ मि. मी. केज : ७१ मि.मी. धारूर : ८३ मि.मी. काही भागांत १०० मि.मी. पेक्षा जास्त पाऊस पडल्याने अतिवृष्टी घोषित करण्यात आली आहे. ही माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिली. --- उपस्थित मान्यवर या पाहणी दौऱ्यात मंडळ अधिकारी वंदना विघ्ने, ग्राम महसूल अधिकारी अक्षय डोफे, सामाजिक कार्यकर्ते दिनेश पवार तसेच बाळासाहेब राठोड, रामभाऊ पवार, सुरेश राठोड, सुनील राठोड, रमेश राठोड, विकास राठोड यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते. --- जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचा इशारा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशांत वाघमारे यांनी नागरिकांना आवाहन केले की – नदीकाठ, नाल्याजवळ किंवा धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे. हवामान खात्याच्या सूचना पाळाव्यात. प्रशासन सतत सज्ज आहे, मात्र नागरिकांनीही स्वतःच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे.

## प्रतिक्षाधीन अनुकंपाधारकांची पूर्व अभिलेखे तपासण्यासाठी सोमवारी भरतीपूर्व मेळावा

**नांदेड** दि. 29 ऑगस्ट :- जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जिल्हास्तरावर अनुकंपा धारकांची पूर्व अभिलेखे अनुषंगिक बाबी तपासण्यासाठी सोमवार 1 सप्टेंबर 2025 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन येथे सकाळी 11 वा. जिल्हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा सामाईक प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार जिल्ह्यातील राज्य शासनाच्या कार्यालयांतर्गत रिक्त पदांवर 15 सप्टेंबर 2025 रोजी नियुक्ती द्यावयाची आहे. मुख्यमंत्री यांच्या 150 दिवसांच्या प्रशासनिक सुधारणा कार्यक्रमांतर्गत अनुकंपा नियुक्ती याबाबीचा यात समावेश करण्यात आला आहे. प्रतिक्षाधारक अनुकंपाधारकांची यादी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या www.nanded.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या यादीतील, रिक्त पदांवरील नियुक्तीकरिता आयोजित मेळाव्यास त्यांच्याकडील शैक्षणिक पात्रतेविषयीच्या, जातप्रमाणपत्र, रहिवाशी, वारसा या अभिलेख्यांच्या मूळ तसेच छायांकित प्रतिसह उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी किनवट येथून समाज बांधव मुंबईकडे रवाना

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी २९- ऑगस्ट रोजी मुंबई आझाद मैदान येथे आमरण उपोषण आंदोलन जाहीर केले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत किनवट तालुक्यातील मांडवा,गोकुंदा दरसांगवी,दाभाडी प्रधानसांगवी दुधगाव ,बोधडी घोटी कमठाला,लोणी, गणेशपूर,मारेगाव,बोरगाव कनकवाडी, राजगड,आदी ठिकाणाहून आज मराठा बांधव मोठ्या संख्येने मुंबईकडे रवाना झाले. मराठा आरक्षणासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून आक्रमक लढा देत असलेले मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन अधिक उग्र व निर्णायक बनले आहे. “आरक्षण हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे, तो मिळविल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही,” असा ठाम इशारा समाज







बांधवांनी दिला.न्यायालयाच्या आदेशानुसार २९ ऑगस्ट रोजी केवळ एकच दिवस उपोषण करण्याची परवानगी देण्यात आली आहे. या संदर्भात सकल मराठा समाजाने, “ही एक अट वगळता आम्ही सर्व नियमांचे पालन करू,” असे स्पष्ट मत व्यक्त केले. मराठा आरक्षणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, शासनाच्या निर्णयांना न्यायालयीन स्थगिती मिळाल्याने समाजामध्ये तीव्र असंतोष आहे. यामुळेच आगामी दिवसांत मुंबईत होणाऱ्या आंदोलनाद्वारे शासन व न्यायालयाला जागवण्याचा इशारा सकल मराठा समाजाने दिला आहे.मुंबईकडे रवाना झालेल्या या मोर्चामुळे मराठा आरक्षणाच्या लढ्याला नवी ऊर्जा मिळाली असून, पुढील काही दिवसांत या आंदोलनाचा तोडगा निघतो का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# भाविकांच्या आरोग्यास बाधा पोहोचणार नाही याची खबरदारी घ्या

**श्रीक्षेत्र माहूर तालुका प्रतिनिधी :-**

श्रीक्षेत्र माहूर गडावर पुढील महिन्यात साजरा होणाऱ्या नवरात्र उत्सव या महामहोत्सवासाठी सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीथ चंद्रा दोंतूला यांच्या अध्यक्षतेखाली दि 29 रोजी बैठक घेण्यात आली या बैठकीत नवरात्र उत्सव काळात येणाऱ्या भाविकांच्या आरोग्यालाबाधा पोहोचणार नाही याची खबरदारी घेण्याचे आवाहन उपस्थित सर्व विभाग प्रमुखांसह कर्मचाऱ्यांना सहाय्यक जिल्हाधिकारी जेनित चंद्रा दोंतूला यांनी केले

प्रामुख्याने या बैठकीत सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोंतूला यांचे सह तहसीलदार अभिजीत जगताप गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस पोलीस निरीक्षक गणेश कराड नगराध्यक्ष फिरोज दोसानी नायब तहसीलदार कैलास जेठे नायब तहसीलदार श्रीमती अरुणा सूर्यवंशी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता डी के भिसे वैद्यकीय अधीक्षक डॉ किरण कुमार वाघमारे तालुका आरोग्य अधिकारी डॉ आर डी माचेवार मरविम कंपनीचे अभियंता आर बी शेंडे एसटी महामंडळाचे सी आर समर्थवाड माहूर न प चे कार्यालय अधीक्षक संदीप गजलवाड नको चे अभियंता गिरीश डूबेवार विस्तार अधिकारी रमेश गावंडे डॉ



अभिजीत आंबेकर तलाठी चंद्रकांत बाबर महसूल सहाय्यक प्रभू गावंडे श्री रेणुका देवी संस्थानचे विश्वस्त संजय कान्नव क अभियंता पी व्ही हंचाटे व्यवस्थापक योगेश साबळे वन विभागाचे वनपाल मनोहर कत्तुलवार श्री दत्त शिखर संस्थांनचे लेखापाल प्रकाश गायकवाड यांचे सह देवस्थानचे प्रतिनिधी गडावरील व्यापारी पत्रकार पोलीस मान्यवर उपस्थित होते.

## सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोंतूला यांचे आवाहन

विशेष म्हणजे या बैठकीत नवरात्र महोत्सवात लाखो भावीक येणार असल्याने उपस्थित सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी दिलेली जबाबदारी पार पाडत भाविकांच्या आरोग्याला बाधा पोचणार नाही तसेच त्यांची सुरक्षा व्यवस्था महाप्रसाद तसेच एसटी महामंडळाने त्यांना गडावर पोहोचविण्याची जबाबदारी व्यवस्थित पार पाडत मरावीमने विद्युत पुरवठा खंडित होऊ देऊ नये तसेच सर्व विभाग प्रमुखांनी दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी अशा सूचना यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोंतुला यांनी दिल्या.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ३० ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## झोपताना उशाजवळ लिंबाच्या तुकड्यावर थोडंसं मीठ लावा अन् ठेवा, तुम्हाला हे 5 आश्चर्यकारक फायदे नक्कीच मिळतील



सर्वांच्या स्वयंपाक घरात असणारं लिंबू हे जेवणाची चव वाढवण्यासोबतच आरोग्यासाठीही अनेक पद्धतीने गुणकारी असतं. शरीराला डिटॉक्सिफाय करण्यापासून ते पचनक्रिया वाढवणे, रोगप्रतिकारक शक्ती सुधारणे आणि बरेच काही. तसेच, त्याचा सुगंध असा आहे की तो त्वरित मूड ताजेतवाने करतो. पोटाचे काही समस्या असेल तर लिंबूपाणी हे नक्कीच त्यावर फायदेशीर ठरतं.
लिंबाचे असे फायदे जे जाणून तुम्हालाही आश्चर्य वाटेल. पण तुम्हाला अजूनही असेही काही लिंबाचे फायदे आहेत जे जाणून तुम्हालाही आश्चर्य वाटेल. त्यातील एक म्हणजे लिंबाच्या तुकड्यावर थोडेसे मीठ शिंपडून तुमच्या उशाजवळ ठेवा. हा एक अतिशय गुणकारी उपाय आहे. ज्याचे फायदे कदाचितच तुम्हाला माहित असतील. काय आहेत याचे फायदे जाणून घेऊयात.बंद नाकापासून आराम मिळतो
झोपताना बेडजवळ लिंबाचा तुकडा ठेवल्याने तुम्हाला श्वास घेण्यास मदत होते. लिंबूमध्ये भरपूर अँटीऑक्सिडंट्स आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात जे बंद नाक खुले करण्यास आणि श्वास घेण्यास मदत करतात. ज्यांना दमा किंवा सायनससारखे आजार आहेत त्यांनी विशेषतः लिंबाचा हा उपाय वापरून पहावा कारण ते त्यांच्या फुफ्फुसांचे मार्ग उघडण्यास मदत करते. छातीत जडपणा कमी करण्यासाठी देखील हे फायदेशीर आहे. हळू हळू त्यांना याचा प्रभाव दिसू लागेल. पण यासोबतच डॉक्टरांचा सल्ला आणि उपचार सुरु ठेवणेही तेवढेच महत्त्वाचे आहे रक्तदाब कमी करण्यास मदत करते अनेक अभ्यासांनी हे देखील सिद्ध केले आहे की लिंबू रक्ताभिसरण नियंत्रित करण्यास आणि रक्तदाब कमी करण्यास मदत करते. झोपताना उशाजवळ लिंबाचा तुकडा ठेवल्याने तुम्हाला रात्रभर लिंबाचा ताजा सुगंध येतो, ज्यामुळे रक्ताभिसरण नियमित होण्यास मदत होते. जर तुम्ही उच्च रक्तदाबाच्या समस्येने त्रस्त असाल तर तुम्ही ही युक्ती नक्की वापरून पहा. पण यासोबतच डॉक्टरांचा सल्ला आणि उपचार सुरु ठेवणेही तेवढेच महत्त्वाचे आहे
ताण कमी करण्यासाठी प्रभावीलिंबाचा ताजेतवाने आणि ओलसर असलेला सुगंध ताण कमी करण्यास खूप मदत करतो. अरोमाथेरपीमध्ये लिंबाला 'स्ट्रेस बस्टर' म्हटले जाते. ते आपल्या मेंदूत आनंदी रसायन 'सेरोटोनिन' चे उत्पादन वाढवते, जे मूड स्विंग आणि चिंता कमी करण्यास मदत करते. जर तुम्हालाही तणावाशिवाय शांत झोपायचे असेल तर हा उपाय नक्कीच करू शकता. डासांपासून मुक्तता मिळवा
जर तुम्हाला रात्री झोपताना डासांचा त्रास होत असले तर तुम्ही तुमच्या पलंगावर लिंबाचा तुकडा ठेवावा. खरं तर, डासांना लिंबाचा वास अजिबात आवडत नाही. अशा परिस्थितीत, जर तुम्ही तुमच्यासोबत लिंबू ठेवला तर ते तुमच्या जवळही येणार नाहीत.हवेच्या गुणवत्तेत सुधारणाआजकाल वाढत्या प्रदूषणामुळे प्रत्येकजण चिंतेत आहे. बाहेरची धूळ सहज आपल्या घरातील वातावरावर देखील परिणाम करू शकते. लिंबाचा हा सोपा उपाय यामध्ये मदत करू शकतो. खरं तर, लिंबाच्या विषारी पदार्थांपासून मुक्तता मिळवण्याच्या गुणधर्मांमुळे हवेची गुणवत्ता सुधारते. लिंबाचा तीव्र आणि ताजा वास तुमच्या सभोवतालची हवा नैसर्गिकरित्या शुद्ध आणि ताजी करण्यास मदत करतो. यामुळे चांगली झोप येण्यास देखील मदत होते.

# वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांना खरीप 2024 चा पीकविमा वाटप करा संभाजी ब्रिगेडची निवेदनातून मागणी

अंबाजोगाई (प्रतिनिधी) वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांना खरीप २०२४ चा पीकविमा वाटप करा अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने तालुका कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. संभाजी ब्रिगेडच्या वतीने तालुका कृषी अधिकाऱ्यांना नुकतेच देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, खरीप हंगाम २०२४ चा पीकविमा अद्यापही अंदाजे ७५ टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेला नाही. पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना जाणीवपूर्वक वेठीस धरलं जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची प्रलंबित पीकविमा रक्कमेवरून संभाजी ब्रिगेडच्या वतीने प्रश्न उपस्थित करण्यात आला. पुढील ८ दिवसांत वंचित राहिलेल्या सर्व अंदाजे ७५ टक्के शेतकऱ्यांना खरीप २०२४ चा पीकविमा तात्काळ वाटप करा अन्यथा या प्रश्नी संभाजी ब्रिगेडच्या वतीने शासन, प्रशासन आणि विमा कंपन्यांच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सदरील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रतिलिपी अतिरिक्त जिल्हाधिकारी, आमदार व पीकविमा प्रतिनिधी यांना देण्यात आलेल्या




आहेत. सदरील निवेदनावर संभाजी ब्रिगेडचे मराठवाडा विभागीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण ठोंबरे, वंचित बहुजन आघाडीचे मारूती सरवदे, मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष रामकिसन मस्के, नारायणराव मुळे, परमेश्वर मिसाळ, ॲड.प्रशांत पवार, अजय मुळे, संतोष मुळे, हेमराज देशमुख, सुदर्शन सरवदे, बाळासाहेब इके, हनुमंत देशमुख, वैजनाथ तोडकर, नागनाथ दिवटे, बळीराम सरवदे, गोविंद उगले, महादेव सरवदे, राघू हरंगुळे, महादेव सरवदे, चंद्रकांत उगले, बाळासाहेब हरंगुळे, बालासाहेब शेळके, व्यंकट चव्हाण आदींसह शेतकरी, संभाजी ब्रिगेड, विविध पक्ष, संघटना यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आयोजित भजन स्पर्धेला उरण मध्ये उत्तम प्रतिसाद.

प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे (उरण) उरण दि २९ उरण तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या उरण विधानसभा मतदार संघ मर्यादित महिला भजन स्पर्धांना उत्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे. रविवारी उरणच्या जे एन पी ए वसाहतीतील बहू उद्देशिय सभागृहात घेण्यात आलेल्या या भजन स्पर्धेच्या निमित्ताने अनेकांची सुप्त कलाकारी देखील अनुभवायला मिळाली. त्यामध्ये अवध्या १० वर्षांच्या एका चिमुकल्या तबला वादकाने सर्वांचे लक्ष वेधले. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मागील अनेक महिने जिल्हाभरात विविध कार्यक्रम सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून उरण तालुक्यात देखील या स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये तब्बल १३ विविध भजनी मंडळांनी सहभाग नोंदवला होता. सकाळी ९ वाजता सुरू झालेली ही स्पर्धा संध्याकाळी ७ वाजेपर्यंत चालली.या स्पर्धेच्या ठिकाणी राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाच्या कॅबिनेट मंत्री ना. आदितीताई तटकरे यांनी भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले.उपस्थित सर्व मान्यवरांचे भारती समाधान कटेकर यांनी पुष्पगुच्छ शाल श्रीफळ देऊन स्वागत व सत्कार केला.यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून महिला जिल्हाध्यक्ष उमाताई मुंडे, जासई हायस्कूलच्या प्राध्यापिका सुलोचना




सुरेश पाटील, अपूर्वा पतसंस्था अलिबागच्या अध्यक्षा ॲड. कविता प्रवीण ठाकूर उपस्थित होत्या.आपल्या भाषणात मंत्री आदितीताई म्हणाल्या की आमचा आज सर्वात जास्त नामस्मरण झाला आहे. हे खरेच भाग्याचे आहे. उरण तालुक्याच्या सर्व पदाधिकाऱ्यांना धन्यवाद देते. स्पर्धेकांना उद्देशून त्या म्हणाल्या कि या सादरकिरणातून आपण आपली परंपरा जोपासत आहोत हे खूप छान आहे. आपल्या कलेच्या माध्यमातून समाजासमोर कसे पोहोचतो ते खूप महत्वाचे आहे. बक्षिसे कोणाला मिळतील यापेक्षा आज सादर होत आहेत ती भजने आमच्या दृष्टीने सर्वोत्तमच आहेत. त्यामुळे आमच्या दृष्टीने सर्वच मंडळे उत्तम आहेत असे त्यांनी सांगितले. या भजन स्पर्धा आयोजनात उरण तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यामध्ये तालुका अध्यक्ष परिक्षित ठाकूर, विधानसभा क्षेत्र अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर, माजी जिल्हा परिषद सदस्या कुंदाताई वैजनाथ ठाकूर, माजी अध्यक्ष मनोज भगत, शहर अध्यक्ष तुषार ठाकूर,शहर उपाध्यक्ष सुमिता तुपगावकर,श्री गुरुकृपा संगीत परिवारचे अध्यक्ष सुप्रिया घरत, तुषार घरत यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. या निमित्ताने मंत्री आदितीताईंनी एक घोषणा केली असून यावर्षी ज्या काही सर्वच तालुक्यात तालुका स्तरीय भजन स्पर्धा झाल्या आहेत. त्यांच्यातील विजेत्यांच्या साठी आपण पुढील वर्षी जिल्हास्तरीय स्पर्धा ठेवणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. त्यांच्या घोषणेचे स्पर्धकांनी उत्स्फुर्तपणे स्वागत केले. या स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक आई भवानी प्रासादिक भजन मंडळ सांताकृझ पुर्व यांना मिळाला असून गायिका कु. ऋतिका मुरूडकर या होत्या. द्वितिय क्रमांक आई एकविरा महिला भजन मंडळ दुंदरेपाडा यांना मिळाला असून गायिका सुजाता पाटणकर या होत्या. तृतिय क्रमांक ओम साई भजन मंडळ खरसुंडी खालापूर यांना मिळाला असून त्यांच्या गायिका हर्षदा सालेकर या होत्या तर उत्तेजनार्थ पारितोषिक श्री. कृष्ण प्रासादिक भजन मंडळ कुडूस अलिबाग यांना मिळाला असून त्यांच्या गायिका पुजा पाटील या होत्या. स्पर्धेत उत्कृष्ट तबलावदक म्हणून ओमकार कराळे यांना घोषित करण्यात आले तर उत्कृष्ट गायिका म्हणून पुनम आगरकर यांना गौरविण्यात आले. या संपुर्ण स्पर्धेचे परिक्षण माऊली सावंत, ओम बोंगाडे आणि भाग्यश्रीताई देशपांडे यांनी केले.उरण तालुक्यात भजन स्पर्धेचे पहिल्यांदाच आयोजन केले गेल्याने समस्त भजन मंडळ, भजन प्रेमी, अध्यात्मिक भाविक भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले होते. सुप्रिया घरत, तुषार घरत यांनी सुंदर व उत्तम असे कार्यक्रमाचे आयोजन,नियोजन केल्याने सर्व जनतेनी त्यांचे व आयोजकांचे आभार मानले आहेत.

# कर्मचाऱ्यांच्या कौतुकास्पद कार्यामुळेच किनवट आकांक्षित तालुका राज्यात तिसरा यापुढेही दुर्गम भागाच्या विकासासाठी सर्वांनी झटावे - आमदार भीमराव केराम

प्रतिनिधी सतिश घुले (नांदेड) किनवट : दुर्गम व कमी विकसीत भागातील नागरीकांचे जीवनमान सुधारणे , विद्यमान योजनांचे एकत्रीकरण करून योग्य परिणाम साधने करिता आखलेल्या " आकांक्षित तालुका कार्यक्रम " अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी तळागाळापर्यंत जाऊन कौतुकास्पद कामगिरी केल्यामुळेच किनवट तालुका हा राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आला आहे. ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. भविष्यातही या दुर्गम भागाच्या विकासासाठी सर्वांनी असेच मनलावून झटून काम करावे. असे प्रतिपादन आमदार भीमराव केराम यांनी केले.

येथील एन.के. गार्डनमध्ये नीती आयोग : भारत सरकार अधिनस्त आकांक्षित किनवट तालुका कार्यक्रम , पंचायत समिती , किनवटच्या वतीने आयोजित " संपूर्णता अभियान सन्मान सोहळा व 'आकांक्षा हाट ' शुभारंभ कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना ते बोलत होते.

यावेळी तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर , गट शिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड , प्र. बालविकास प्रकल्प अधिकारी शिवाजी जामोदे , सामाजिक कार्यकर्ते दयानंद दराडे मंचावर उपस्थित होते. गट विकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले. केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे यांनी सूत्रसंचालन केले.



दीप प्रज्वलन झाल्यानंतर शाल , पुष्पगुच्छ व ग्रंथ भेट देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर कौतुकास्पद कामगिरी केलेले तत्कालीन गट विकास अधिकारी पुरुषोत्तम वैष्णव , निवृत्त जिल्हा मृद सर्वेक्षण व चाचणी अधिकारी प्रकाश पल्लेवाड , तत्कालीन कृषी अधिकारी बालाजी मुंडे व त्यांचे 24 कृषी सहायक , तालुका आरोग्य अधिकारी डॉ. के.पी. गायकवाड व त्यांचे 8 सीएचओ , 9 एएनएम , 1 बीसीएम , 9 आशावर्कर , तत्कालीन बाल विकास प्रकल्प अधिकारी अश्विनी ठकरोड व त्यांच्या 15 अंगणवाडी सेविका , विस्तार अधिकारी (पं) निवृत्ती मुकनर , आकांक्षित तालुका फेलो पांडुरंग मामीडवार , पोषण परसबाग निर्मिती टीम लीडर गंगाधर घ्यार यांचा प्रशस्ती पत्र व ग्रंथ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. आकांक्षा हाट चे उदघाटन...

व्होकलं फॉर लोकल उपक्रमाअंतर्गत स्थानिक उत्पादनाचे प्रदर्शन आणि प्रचार करण्यासाठी याच कार्यक्रमात आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते 'आकांक्षा हाट' चे उदघाटन करण्यात आले . यात उमेद अभियान अंतर्गत महिला स्वयंसहायता समूह, किनवट स्थित अतिप्रभावित मेगा पाणलोट प्रकल्प टिम, बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय यांनी सदर प्रदर्शनात सहभाग नोंदविला. यात स्थानिक स्वादिष्ट पदार्थ, हस्तनिर्मित कपडे, रानभाज्या, वस्तू, जैविक औषधे आणि इतर स्थानिक उत्पादीत वस्तुसह विविध वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्री करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यालयीन अधिक्षक अमोल टोम्पे, कृषि अधिकारी सिकंदर पठाण, सहाय्यक लेखा अधिकारी सुनिल नेम्मानिवार, वरिष्ठ सहाय्यक राजेश म्याकलवार, विस्तार अधिकारी कैलास गायकवाड, जीवन कांबळे, श्रीमती एस . एल. चव्हाण, आकांक्षित तालुका समन्वयक पांडुरंग मामीडवार, कनिष्ठ सहाय्यक अंकुश राठोड, इतर कार्यालयीन कर्मचारी, सर्व ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी, कृषि सहाय्यक, समुदाय आरोग्य अधिकारी, केंद्र प्रमुख , एएनएम, आशा, अंगणवाडी सेविका, आयसिआरपी यांनी परिश्रम घेतले.

# नाशिक जिल्ह्याच्या यशाचा झेंडा राज्यभर फडकला, पंचायत विकास निर्देशांकात मिळवला पहिला क्रमांक

प्रतिनिधी ग्रामविकास विभागामार्फत आयोजित कार्यशाळेत दि. २६ रोजी नाशिक जिल्हा परिषदेचा राज्यातील पंचायत विकास निर्देशांक (Panchayat Advancement Index - PAI) अंतर्गत प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल गौरव करण्यात आला. या गौरव सोहळ्यात ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे व प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्या हस्ते जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला नाशिक जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग) डॉ. वर्षा फडोळ यांसह मान्यवर उपस्थित होते. जिल्ह्याचा यशाचा झेंडा राज्यभर फडकला असल्याने सर्वांनी समाधान व्यक्त केले. सन २०२२-२३ च्या मूल्यांकनानुसार नाशिक जिल्हा परिषद राज्यात अव्वल ठरली आहे. तसेच नाशिक पंचायत समितीने राज्यात पहिला क्रमांक, चांदवड पंचायत समितीने नववा क्रमांक मिळवला. ग्रामपंचायतींच्या स्तरावर नाशिक तालुक्यातील दरी ग्रामपंचायतीला राज्यात पाचवा क्रमांक, तर इगतपुरी तालुक्यातील मोडाळे ग्रामपंचायतीला सहावा क्रमांक मिळाला. या सर्व स्वराज्य संस्थांचा देखील कार्यक्रमात गौरव करण्यात आला. सन २०२२-२३ मूल्यांकनानुसार जिल्हा परिषदेस पंचायत विकास निर्देशांकात मिळालेला राज्यातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार हा संपूर्ण जिल्ह्याचा सन्मान आहे. शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व ग्रामपंचायतींचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी पुढेही सातत्याने प्रयत्नशील राहू," असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी सांगितले. नाशिक जिल्हापरिषद नेहमीच अग्रेसर आधुनिक भारताची निर्मिती झाली त्यात पंचायत राज हा एक अभिनव




प्रयोग आहे. बलवंतराय मेहता समितीने ग्रामीण विकासात ग्रामीण जनतेला सहभागी करून घेण्यासाठी त्रिस्तरीय पंचायत राज पध्दतीची शिफारस केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने १ मे १९६२ रोजी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चा कायदा सहमत केला व जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद, गट पातळीवर पंचायत समिती व गाव पातळीवर ग्रामपंचायत अशा रीतीने त्रिस्तरीय पंचायत राजची स्थापना केली. १ मे १९६२ मध्ये नाशिक जिल्हा परिषदेची स्थापना झाली. आज रोजी १५ पंचायत समिती आणि १,३७३ ग्रामपंचायती ग्रामीण भागांच्या विकासासाठी कार्यरत आहेत. ७३ व्या घटना दुरूस्तीद्वारे महिलांना सत्तेत सहभाग दिलेला असून ग्रामसभाद्वारे ग्रामपंचायतींना जादा अधिकार देणेत आलेले आहे. शासनाची कोणतीही नवीन योजना, अभियांन, मोहिम राबविण्यात नाशिक जिल्हा परिषद नेहमीच अग्रेसर राहिलेली आहे.

# मुंबई पोलिसांच्या सर्व सुट्ट्या तडकाफडकी रद्द, जरांगेंच्या आंदोलनामुळे प्रशासन अलर्ट

### नेमका काय आदेश निघाला!

मिळालेल्या माहितीनुसार सुट्टीवर असलेले, रुग्णनिवेदन, अर्जित रजा, किरकोळ रजा आणि गैरहजर असलेल्या पोलिसांना तातडीने कर्तव्यावर येण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. नायगावच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकांच्या पत्राद्वारे तशा सूचना केल्या आहेत. राज्यात सुरू असलेला गणेशोत्सव आणि मराठा आरक्षणासाठी मराठा बांधव मोठ्या प्रमाणात मुंबईत दाखल आहेत. तसेच इतर पोलीस कर्मचारी सुट्टीवर असल्याने कर्तव्यावर असलेल्या पोलिसांवर ताण येत आहे, त्यामुळेच हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.



मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदानात आमरण उपोषण चालू केले आहे. जोपर्यंत आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत मागे फिरणार नाही. माझा जीव गेला तरी चालेल पण आरक्षण घेणारच, असे जरांगे म्हणाले आहेत. त्यामुळे जरांगे यांचे समाधान होण्यासाठी नेमके काय करायला हवे? असा प्रश्न सरकारपुढे उभा ठाकले आहे. दुसरीकडे ओबीसी संघटनांनीही उपोषणाचे अस्त्र बाहेर काढले आहे. आरक्षण देण्यास विरोध केल्यास आणखी मराठा समाज मुंबईकडे कूच करणार आहे, असेही जरांगे यांनी सांगितले आहे. त्यामुळे आगामी काळात मुंबईत मराठा आंदोलकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. परिणामी मुंबईत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. हीच बाब लक्षात घेता आता राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. गणेशोत्सव आणि मनोज जरांगे यांचे आंदोलन यामुळे सरकारने मुंबई पोलिसांच्या सर्व सुट्ट्या रद्द केल्या आहेत.

, लोकशाहीच्या चौकटीबाहेर कुणीही जाऊ नये. मराठा समाजाच्या नेत्यांनी अभ्यास करून मागणी करावी, असंही यावेळी फडणवीस यांनी म्हटलं. खबरदारी म्हणून घेण्यात आला निर्णयकायदा व सुव्यवस्थेच्या अनुशंगाने मुंबईत अधिक पोलीस असणे गरजेचे असून त्या पार्श्वभूमीवर हे आदेश काढण्यात आल्याचीही माहिती मिळत आहे. जरांगे यांच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी हजारो लोक मुंबईत आले आहेत. त्यांच्या वाहनांची व्यवस्था पाहण्यापासून इतर सर्वच गोष्टींची जुळवाजुळव करावी लागणार आहे. त्यामुळेच कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भभऊ नये यासाठी खबरदारी म्हणून पोलिसांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता सुट्टीवर असलेल्या आणि मुंबई पोलिसात कार्यरत असलेल्या सर्वच पोलिसांना तत्काळ सेवेसाठी हजर राहावे लागणार आहे.

## लोकशाही पत्रकार संघाने गणेशोत्सवाच्या माध्यमातून हिंदू संस्कृती जपली - परशुराम गुरखूदे


### द्वारकाधीश मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष परशुराम गुरखूदे यांच्या हस्ते लोकशाही पत्रकार संघाच्या 'श्री' ची आरती

बीड दि.२८(प्रतिनिधी)- गणेशोत्सव आनंदात आणि शांततेत साजरा करण्याची हिंदू संस्कृती आहे. त्या हिंदू संस्कृतीला अनुसरून लोकशाही पत्रकार संघाने शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याची संस्कृती जपली असल्याचे मत द्वारकादास मित्रमंडळाचे संस्थापक अध्यक्ष परशुराम गुरुखुदे यांनी लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने स्थापन झालेल्या गणरायाच्या आरतीच्या प्रसंगी पदाधिकाऱ्यांशी बोलताना म्हटले. यावेळी त्यांनी बीड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी गौरी गणपती सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करावा असे आवाहन देखील नागरिकांना केले..

लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने धानोरा रोड परिसरात धानोरा रोडचा राजा गणेश मंडळाच्या नावाने गणरायाची स्थापना करण्यात आली. गणरायाच्या स्थापनेच्या तिसऱ्या दिवशी द्वारकादास मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष परशुराम गुरखूदे यांच्या हस्ते श्री ची आरती करण्यात आली. आरती नंतर द्वारकाधीश मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष परशुराम गुरखूदे उपस्थित नागरिकांनी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी बोलत होते. यावेळी बोलताना परशुराम गुरखूदे म्हणाले की, सर्व सण आनंदात आणि शांततेत साजरा करण्याची हिंदू संस्कृती आहे. त्या हिंदू संस्कृतीला अनुसरून लोकशाही पत्रकार



संघाने शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याची संस्कृती जपली आहे. त्याच प्रमाणे बीड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी गौरी गणपती सणासह ईद सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करावा. सध्या महाराष्ट्रामध्ये मुसळधार पावसाचे वातावरण आहे. या वातावरणात प्रत्येक नागरिकांनी सुरक्षितरित्या रहावे स्वतःचे आणि आपल्या शेजाऱ्याची काळजी घ्यावी असे आव्हाने यावेळी गुरुखुदे यांनी नागरिकांना केले. आरती नंतर परशुराम गुरखूदे यांचा सत्कार लोकशाहीचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य व पत्रकार नितेश उपाध्ये यांनी केला. यावेळी लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ, साहस आदोडे, शिवप्रसाद सिरसाट, श्रीकांत कुलकर्णी, अविनाश कुलकर्णी, आदी उपस्थित होते.




सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट्स अकॅडमी माजलगाव येथे शिकत असलेली .कुं भैरवी जनार्दन गोरे .या विद्यार्थिनी नी सेल्फ डिफेन्स ( सहसंरक्षण ) (आत्मरक्षा ) व समाजामध्ये मुलीवर होत चाललेल्या अत्याचार यावर विचार करून स्वतः होऊन एक सुंदर असा लेख लिहिला होता त्याचा हा लेख एका पुस्तकामध्ये प्रसारित करण्यात आला त्याबद्दल आज 29 ऑगस्ट शुक्रवार रोजी सेल्फ डिफेन्स अकॅडमी चे सर्वेसर्वा संस्थापक अध्यक्ष बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर रेनशी मजेद सर यांनी भैरवी गोरे याचा छोटासा सत्कार केला इयत्ता ८ वीत. शिकत असताना मूर्ती लहान कीर्ती महान अशी ही मुलगी समाजातील सर्व मुलींसाठी आदर्श असल्यासारखी भैरवी माजलगाव तील सर्व मुलींना आत्मसुरक्षा ही काला शिकावी याकरिता यांनी प्रेरित केले आहे व असेच लेख लिहत जा यासाठी त्याला अभिनंदन दिले ✓



भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांचा सत्कार करताना चंद्रकांत नाईक संभाजी भोसले गवते पाटील रमेश मातकर बाळासाहेब नाईक इत्यादी कार्यकर्ते हितचिंतक यावेळी छायाचित्र दिसत आहेत

## मराठा आरक्षणासाठी आमरण उपोषण : बीड जिल्ह्यातील आमदारांचा जरांगे पाटीलांना पाठिंबा

मुंबई : प्रतिनिधी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे या मागणीसाठी मराठा आरक्षण चळवळीचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. त्यांच्या या उपोषणाला मोठा जनसमर्थन मिळत असून राज्यातील अनेक लोकप्रतिनिधी देखील प्रत्यक्ष व्यासपीठावर हजर राहून त्यांना पाठिंबा दर्शवत आहेत. बीड जिल्ह्यातील चार आमदारांनी शुक्रवारी आझाद मैदानावर जाऊन जरांगे पाटील यांना प्रत्यक्ष भेटून आपला पाठिंबा जाहीर केला. यात बीडचे आमदार संदीप क्षीरसागर, गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित, माजलगावचे




आमदार प्रकाश सोळंके आणि आष्टी-पाटोद्याचे आमदार सुरेश धस यांचा समावेश आहे. आमदारांनी व्यासपीठावरून बोलताना राज्य सरकारने मराठा समाजाच्या दीर्घकाळ प्रलंबित मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी



मागणी केली. मराठा समाजाला न्याय मिळावा यासाठी आवश्यक ती लढाई आपण एकजुटीने लढणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, जरांगे पाटील यांच्या उपोषणाला मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित



राहत आहेत. उपोषणस्थळी पोलीस बंदोबस्त तैनात असून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून होत आहे. राज्य सरकार मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत कोणता निर्णय घेते याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

### तरुण पिढीने वाहतुकीच्या नियमांशी मैत्री करावी अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांचे आवाहन

## एसपीसी अंतर्गत वाहतुक उपक्रमांत विद्यार्थ्यांना वाहतुकीची माहिती

बीड (प्रतिनिधी)-सुरक्षिततेची सवय कुमारवयापासूनच लागावी या हेतूने बीडचे पोलीस अधिक्षक नवनीत काँवत व अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष सानप, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर व वाहतुक शाखेचे सर्व अंमलदार तसेच केएसके कॉलेजचे एनसीसीचे कॅप्टन बालासाहेब पोटे, बलभीम महाविद्यालयाचे शैलेश अकुलवार, बंकटस्वामीचे प्रा.जे.डी.चव्हाण या सर्वांच्या संयुक्त विद्यमाने वाहतुकीचे नियम तरुण पिढीला समजावेत भविष्यात कुठलीही अघटित घटना घडू नये याची दक्षता म्हणून आज दि.29 ऑगस्ट 2025 रोजी हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या स्मृतिदिनानिमित्त राष्ट्रीय क्रीडादिनाचे औचित्य साधून एसपीसी अंतर्गत छ.शिवाजी महाराज चौक,अण्णाभाऊ साठे चौक, सांगली बँक कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर, नगर नाका, मोंढा टी पॉइंट, जयभवानी चौक, बार्शी नाका येथे वाहतुकीच्या अंमलदारांनी एनसीसीचे विद्यार्थी व विद्यार्थीनी यांना वाहतुक नियमांचे प्रशिक्षण दिले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाने सुरु झाली यावेळी बोलतांना श्री. पांडकर म्हणाले की, तरुण पिढीला वाहतुकीच्या नियमांची सवय अगदी महाविद्यालयीन जीवनातच लागली पाहिजे त्यामुळे त्यांनी वाहतुकीच्या नियमांशी मैत्री करावी तसेच आजचे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत याकडे लक्ष द्यावे. बरेचसे अपघात आजपर्यंत खराब रस्त्याने नव्हे तर मादक पदार्थ सेवन केल्याने झालेले आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर राहावे असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. तसेच यावेळी वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष सानप यांनी वाहतुक नियमांची सुटसुटीत मांडणी करुन सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना वाहतुकीच्या नियमांचे ज्ञान दिले. तसेच यावेळी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी संवाद साधताना म्हणाले की, गाडी चालवताना मोबाईल वापरणे टाळावे, हेल्मेट वापरावे वाहनाचे सर्व कागदपत्रे




जवळ ठेवावेत वाहनांच्या नियमांचे पालन करावे यामुळे जीवन सुखकर होईल व अपघात होणार नाहीत. तसेच यावेळी पोलीस हवालदार विष्णु काकडे म्हणाले की, पुस्तकानंतर विद्यार्थ्यांना वाहनांचे आकर्षण असते त्यामुळे जसा आपण पुस्तकांचा अभ्यास करतो तसेच वाहतुकीच्या नियमांची माहिती घेवून व तिचे कटाक्षाने पालन करुन वाहन चालवावे ही जबाबदारी प्रत्येक तरुणाची राहील. कार्यक्रमाच्या शेवटी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगर नाका व परत छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत धावण्याची स्पर्धा घेण्यात आली. यावेळी प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना सत्कार करुन पाठीवर शाब्बासकीची थाप देण्यात आली. यावेळी वाहतुक शाखेचे अंमलदार पो.ह.नागरगोजे, कुडके, पायाळ, पोलीस अंमलदार पोलीस नाईक मुंडे, पोलीस कॉन्स्टेबल मोरे, टुले, महिला पोलीस कॉन्स्टेबल पवार, पो.ह.सुनिल जाधव, पो.ह.ज्ञानेश्वर जाधव, अंमलदार सिध्दांत गोरे व ड्रायव्हर पो.ह.संतोष हरके, अंमलदार दत्ता कदम आदींची उपस्थिती होती.


This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com